# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**MID-TERM EXAMINATION 2024-25**

**MARATHI**

Class : V — Duration : **3** Hrs
Date : 25.09.2024 — Max. Marks : **80**
Admission No.: — Roll No.:

---

उत्तरपत्रिकेसाठी सूचना : –

(1) सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(2) खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
(3) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## खंड क वाचन कौशल्य

प्रश्न **1 अपठित गदयांश –** (5×1=5)

एका घनदाट जंगलात अनेक पक्षी व प्राणी राहत होते जसे चिमणी, मोर, कावळा, पोपट इत्यादी. सगळे पक्षी व प्राणी आनंदात राहत व खूप मस्ती करत. त्याच जंगलात एक आंब्याचे झाड होते. त्या झाडावर एक कोकिळा व एक कावळी राहत असत. कावळी साधी भोळी तर कोकिळा खूप लबाड होती. कावळी सकाळी लवकर उठून चारा शोधायला बाहेर जात असे. कोकिळा मात्र आळशी होती ती काहीही काम करत नसे . तिला वाटे मजेत रहावे .फक्त मजा करावी.

प्रश्न

**1 जंगल कसे होते ?**

क विरळ — ख घनदाट — ग मोठे

**2 जंगलात कोण राहत होते ?**

क पक्षी व प्राणी — ख वाघ — ग सिंह

**3 पक्षी – प्राणी कसे राहत ?**

क मजेत — ख दुखात — ग आनंदात

**4 पक्षी व प्राणी काय करत ?**

क मस्ती — ख दंगा — ग खोडया

**5 जंगलात कशाचे झाड होते ?**

क वडाचे — ख कडूलिंबाचे — ग आंब्याचे

**प्र 2 अपठित गदयांश –** (5×1=5)

एका जंगलात भरपूर उंदीर आनंदाने राहत होते. एके दिवशी ते सगळे एकत्र खेळत होते. तेवढयात एक हत्ती तिथे आला. हत्तीला दोन मोठे–मोठे दात आणि एक सोंड होती हत्तीच्या पायाखाली भरपूर उंदीर दबले गेले ते राहिलेल्या उंदीरांनी बघितले आणि हत्तीला तेथून जाण्याची विनंती केली. तो तेथून दूर निघून गेला . एक दिवस जंगलात शिकारी आले. त्यांनी हत्तीला एका झाडाला बांधून ठेवले. तो मोठयाने ओरडू लागला. तो आवाज ऐकून उंदीर त्याच्या मदतीला आले आणि त्यांनी हत्तीला मोकळे केले.

प्रश्न –

**1 जंगलात कोण राहत होते ?**

क माकड — ख वाघ — ग उंदीर

2 **खेळत असतांना कोण तेथे आले ?**

क गाय　　　　　　　खख बैल　　　　　　　ग हत्ती

3 **हत्तीला किती दात होते ?**

क दहा　　　　　　　ख दोन　　　　　　　ग सहा

4 **हत्तीच्या पायाखाली कोण दबले ?**

क उंदीर　　　　　　　ख मुंग्या　　　　　　　ग साप

5 **एक दिवस जंगलात कोण आले ?**

क अधिकारी　　　　　　ख कामगार　　　　　　ग शिकारी

**खंड ख –व्याकरण**

**प्र 3 वर प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा :–** **(2×1=2)**

1 झाडा + वर =

2 टेबलर + वर =

**प्र 4 विरुध्दार्थी शब्द लिहा –** **(2×1=2)**

1 शांत x ( रागीट / अशांत / मोठा)

2 जास्त x ( कमी / खूप / ढीग )

**प्र 5 –समानार्थी शब्द लिहा –** **(2×1=2)**

1 नदी = ( तलाव / सरिता / सागर )

2 पाणी = ( जल / धरा / आकाश )

**प्र 6 वचन बदला –** **(2×1=2)**

1 झगा ( झारा / झरा / झगे )

2 बाग (बागा / बागे / झाडे )

**प्र 7 लिंग बदला –** **(2×1=2)**

1 माता (बाबा / बाई / पिता )

2 भाऊ (बहीण / आई / मावशी )

**प्र 8 सर्वनाम ओळखा –** **(2×1=2)**

1 मी व श्याम मित्र आहेत .

2 ती छान मुलगी आहे .

**प्र 9 काळ ओळखा –** **(2×1=2)**

1 आई गावाला गेली .

2 उदया मी गावाला जाणार.

**प्र 10 सर्वनाम ओळखा –** **(2×1=2)**

1 आम्ही सर्व एका वर्गात शिकतो .

2 मी उदया मुंबईला जाणार .

**खंड ग –साहित्य**

**प्र 11 पठित गदयाश –** **(5×1=5)**

एकदा बादशाहने आपल्या मंत्राला राज्याचा हिशोब मागितला. मंत्री लगेच मौलवींना बोलवण्यासाठी सैनिकाला पाठवतो ..मौलवी येऊन बादशहाला हिशोब दाखवितो . हिशोब पाहून बादशहा नाराज झाले . कारण एकदाही मौलवींनी नसिरूद्दीन मुल्लाच्या शेतावरचा कर वसूल

केलेला नव्हता. बादशहाने विचारल्यावर मौलवींनी सांगितले महाराज जेव्हा मी त्याच्याकडे शेतसारा मागतो. तेव्हा त्याच्याकडे देण्यासाठी काहीही नसते.

प्रश्न –

1 बादशहाने कोणाला हिशोब मागितला ?

2 मौलवीना बोलवण्यासाठी कोण जाते ?

3 कोण येऊन बादशहालाा हिशोब दाखवितो ?

4 हिशोब पाहून कोण नाराज झाले ?

5 नसिरूद्दिनने काय वसूल केलेला नव्हता ?

**प्र 12 पठित पदयाश –** **(5×1=5)**

इमारतीच्या पुढे बघा
सुंदर सुंदर बाग असे
नाजूक साजूक फुलपाखरू
गिरक्या घालीत येई कसे !
वा–यावरती हिरवे हिरवे
गवत कोवळे छान डुले
निळा जांभळा ताुबुस पिवळा
रंग लेवूनी येत फुले!

प्रश्न –

1 गवत कसे आहे ?

2 फुलपाखरे कशी आहेत ?

3 बाग कशी आहे ?

4 बाग कोठे आहे ?

5 फुलपाखरू बागेत कसे येते ?

**प्र 13 जोडया लावा –** **(4×1=4)**

1 फुल – साजूक

2 सुंदर– गवत

3 हिरवे – पाखरू

4 नाजूक– बाग

**प्र 14 रिकाम्या जागी योग्य शब्द भरा –** **(4×1=4)**

1 चिंटू फारच —–—–— मुलगा होता.

2 बांबूचे झाड —–—–होते.

3 जगात ज्याच्याकडे हिंम्मत ,शक्ती असते त्यांनाच —–—–—असतो.

4 गर्वाचे घर नेहमीच —–—–—असते.

**प्र 15 कोण कोणास म्हणाले ते लिहा –** **(2×1=2)**

1 त्याच्याकडे देण्यासाठी काहीही नसते .

2 जे पीक असेल त्याचा आर्धा भाग घेऊन या.

**प्र 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – (कोणतेही सहा)** (**7x2**=14)

1 बादशहाने आपल्या मंत्रीकडे कशाचा हिशोब मागितला?

2 बादशहाने काय आदेश दिला ?

3 खोडकर मुलाचे नाव काय होते ?

4 बागेत भिरभिरत कोण येतात ?
5 भारतमातेची मुले कशी आहेत ?
6 इमारतीच्या पुढे काय आहे ?
7 कशाचे झाड गर्विष्ठ होते ?
8 फुलपाखरे कोणकोणत्या रंगाची आहे ?
9 समानतेची शिकवण कोणी जगाला दिली ?

**प्र 17 जाहीरात लेखन –** **(1×5=5)**

आपल्या आवडत्या वस्तूसाठी साठी एक आकर्षक जाहीरात तयार करा

**प्र 18 निबंध लेखन –( कोणताही एक)** **(1×5=5)**

1 माझी आई 2 माझा मित्र 3 माझी बाग

**प्र 19 स्वपरिचय लिहा –** **(1×5=5)**

**प्र 20 चित्र वर्णन** **(1×5=5)**



——————— समाप्त ———————